# मिरा-भाईंदर महानगरपालिका

स्व. इंदिरा गांधी भवन, मुख्य कार्यालय, छत्रपती शिवाजी महाराज मार्ग,
भाईंदर (प.), ता. जि. ठाणे - ४०१ १०१.

जा.क्र.मनपा/वैद्यकीय/ ४४५/२०२१-२२ दि. ०४/०५/२०२१

## ।। जाहिरात ।।

**विषय : कोरोना विषाणू (कोव्हिड १९) प्रादुर्भाव रोखण्यासाठी मिरा-भाईंदर महानगरपालिकेत खालील पदांची एकत्रित ठोक मानधन तत्त्वावर करार पद्धतीने आवश्यकतेनुसार नेमणूक करण्याबाबत...**

मिरा-भाईंदर महानगरपालिका कार्यक्षेत्रात कोरोना विषाणू (कोव्हिड १९) प्रादुर्भाव रोखण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाययोजना करण्याकरिता खालील पदांकरिता जाहिरात प्रसिद्ध करून थेट मुलाखतीद्वारे (Walk In Interview) इच्छुक व पात्र उमेदवारांची निवड करणेकामी अर्ज करण्यासाठी कळविण्यात येत आहेत. खालील नमूद केलेली शैक्षणिक अर्हता व पात्रता धारण करणाऱ्या तसेच इतर अटींची पूर्तता करणाऱ्या उमेदवारांनी, विहित नमुन्यातील अर्ज व आवश्यक त्या प्रमाणपत्रांच्या साक्षांकित प्रतींसह दि. ०८/०५/२०२१ रोजी सकाळी १०.०० ते दुपारी ०२.०० वा. या कालावधीत वैद्यकीय आरोग्य विभाग, पहिला मजला, मिरा-भाईंदर महानगरपालिका, (स्व. इंदिरा गांधी भवन), मुख्य कार्यालय, भाईंदर (प.) येथे मुलाखतीसाठी उपस्थित राहावे.

| अ. क्र. | पदनाम | शैक्षणिक पात्रता व अनुभव | मासिक ठोक एकत्रित मानधन | एकूण पदांची संख्या (*) |
|---|---|---|---|---|
| १ | वैद्यकीय अधिकारी (MBBS) | मान्यताप्राप्त विद्यापीठाची MBMS पदवी आवश्यक व महाराष्ट्र मेडिकल कौन्सिलची नोंदणी आवश्यक. | रु. ८०,०००/- | १० |
| २ | वैद्यकीय अधिकारी (आयुष) | मान्यताप्राप्त विद्यापीठाची बी. ए. एम. एस., बी. एच. एम. एस., बी. यु. एम. एस. व तत्सम अर्हता पदवी आवश्यक व महाराष्ट्र मेडिकल कौन्सिलची नोंदणी आवश्यक. | रु. ६०,०००/- | ६० |
| ३ | प्रसविका | दहावी/बारावी परीक्षा उत्तीर्ण आणि मान्याताप्राप्त संस्थेतील ऑक्झीलेरी मिडवाईफ नर्सिंग कोर्स पूर्ण, महाराष्ट्र नर्सिंग नोंदणी आवश्यक. | रु. २५,०००/- | ४०० |
| ४ | बायोमेडिकल इंजिनियर | बायोमेडिकल अभियांत्रीकी क्षेत्रातील पदवी व संबंधित क्षेत्रात काम केल्याचा किमान एक वर्षाचा अनुभव आवश्यक. | रु. ४०,०००/- | ०३ |

(* पदांच्या संख्येत बदल होण्याची शक्यता आहे.)

उपरोक्त जाहिरातीबाबतची सविस्तर माहिती मिरा-भाईंदर महानगरपालिकेच्या https://mbmc.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

**अटी व शर्ती :**

१) उमेदवाराची निवड ही कोव्हिड १९ साथ कालावधीपुरतीच राहणार असून सदर साथ कमी झाल्यास किंवा रुग्णालयातील कोव्हिड-१९ उपचार कक्ष बंद झाल्यास किंवा रुग्णसंख्या कमी झाल्यास सदरील नेमणूक तात्काळ संपुष्टात आणण्यात येईल. त्यासाठी १ महिन्याची नोटीस दिली जाणार नाही, याची स्पष्ट नोंद घ्यावी.

२) नियुक्तीच्या कालावधीत नियुक्तीच्या ठिकाणी सोपविलेले काम पूर्ण करण्याची जबाबदारी संबंधित उमेदवाराची राहील.

३) सदर नियुक्ती तात्पुरत्या स्वरूपात ठोक मानधनावर देण्यात येणाऱ्या आल्यामुळे संबंधितास महानगरपालिकेच्या /शासनाच्या कोणत्याही संवर्गात सेवा समावेशनाबाबत / सामावून घेण्याबाबतचा अधिकार व हक्क नसेल.

४) इच्छुक व पात्र उमेदवारांनी जाहिरातीमधील नमूद केलेल्या शैक्षणिक पात्रता / अर्हता (इयत्ता दहावी व त्यापुढील) तसेच अनुभव प्रमाणपत्र यांच्या अर्जासोबत छायांकित प्रती सादर कराव्यात.

**निवड प्रक्रिया :-**

प्रशासकीय किंवा अन्य कारणास्तव भरती प्रक्रिया कोणत्याही वेळेस कोणत्याही टप्प्यावर थांबविण्याचे अधिकार आयुक्त, मिरा-भाईंदर महानगरपालिका यांना राहतील.

**(मा. आयुक्त यांच्या मान्यतेने)**

सही/-
(संभाजी वाघमारे)
उपायुक्त (वैद्यकीय)
मिरा-भाईंदर महानगरपालिका

जा.क्र.मनपा/जनसंपर्क/७२/२०२१-२२
दि. ५/५/२०२१